# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: २१००१:२०१८) (ISO/IES: २७००१:२०१३)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१००/१०१/१६४
ई-मेल: director@msbte.ac.in संकेत स्थळ: www.msbte.ac.in

जा.क्र.मरातंशिमं/D-५४(अ)/२०२५-२६/ 744 दिनांक:- 25 FEB 2026

**महत्त्वाचे / कालमर्यादीत परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुकला आणि अल्प मुदतीचे अभ्यासक्रम
राबविणा-या पदविका संस्था व स्वायत्त संस्था.

**विषय:- संस्था मॉनिटरिंग सॉफ्टवेअरमध्ये व्दितीय संस्था अवेक्षणासंबंधीची माहिती ऑनलाईन भरणेबाबत...**

उपरोक्त विषयानुसार AICTE मान्यता प्राप्त अभियांत्रिकी (स्वायत्त संस्थासह) पदविका संस्था, PCI मान्यता प्राप्त औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) पदविका संस्था, वास्तुकला परिषद (Council of Architecture) मान्यता प्राप्त पदविका संस्था तसेच शासन मान्यता प्राप्त अल्पमुदतीचे अभ्यासक्रम राबविणा-या संस्था (Non-AICTE) यांचे द्वितीय संस्था अवेक्षण **शैक्षणिक वर्ष २०२५-२६** मध्ये **दि. १८/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६** या कालावधीत प्रत्यक्षपणे (Offline) करण्यात येणार आहे.

तरी मंडळाशी संलग्नित तसेच स्वायत्त सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) व वास्तुकला पदविका संस्था तसेच अल्पमुदतीचे अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना संस्था अवेक्षण संदर्भातील सर्व माहिती ऑनलाईन भरण्यास **दि. ०४/०३/२०२६ ते १२/०३/२०२६** पर्यंत लिंक संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. सर्व स्वायत्त संस्था, ज्या संस्थांचे फक्त एक वेळाच संस्था अवेक्षण केले जाते, अशा संस्थांनी तसेच ज्या संस्थांचे NBA Accreditation झाले आहे अथवा ज्या संस्थांच्या अभ्यासक्रमांना Excellent दर्जा मिळाला आहे अशा सर्व संस्थांनी देखील माहिती भरणे अनिवार्य आहे.

**संस्थांनी भरलेल्या माहितीनुसार ऑनलाईन प्रणालीद्वारे त्याचा उपयोग मंडळाच्या विविध उपक्रमांमध्ये करण्यात येत असल्याने संबधित संस्था प्रमुखांनी सदर माहिती अचुक व परीपूर्ण असेल याची त्यांच्यास्तरावर खात्री करुन घ्यावी.**

वरील माहिती भरताना तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्याबाबत, **मोबाईल नं. ८३५५८७०५४४/ ८६६८५४५३२२** किंवा ई-मेल **acmonitoring@msbte.ac.in** वर संपर्क साधावा, या शिवाय कोणत्याही अडचणी असल्यास संबंधित विभागीय कार्यालयास कळविण्यात याव्यात.

संस्थांनी **०३/०३/२०२६** अखेर पर्यंतची शैक्षणिक माहिती भरणे आवश्यक असुन सदरची माहिती **दि. १२/०३/२०२६** पर्यंत पुर्ण करुन सादर करणे आवश्यक आहे. **दि. १३/०३/२०२६ ते १५/०३/२०२६** या कालावधीत **अभियांत्रिकी, फार्मसी व वास्तुकला संस्थांसाठी रु.१०,०००/- आणि अल्प मुदतीचे अभ्याक्रमाच्या संस्थांसाठी रु. ५,०००/-** एवढे विलंब शुल्क भरुन संस्थांना माहिती सादर करता येईल. त्यामुळे सर्व संस्थांनी उपरोक्त कालावधीतच माहिती भरणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी.

**उपरोक्त कालावधीत संस्था अवेक्षणासंदर्भातील माहिती न भरणा-या संस्थांचे संलग्निकरण काढून घेण्याची कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येईल, यांची सर्व संस्थांनी प्रामुख्याने नोंद घ्यावी.** त्यामुळे सर्व संस्थांनी उपरोक्त कालावधीतच माहिती भरणे अनिवार्य आहे.

(डॉ. मारुती रा. जाधव)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत:-उपसचिव, म.रा.तंत्र शिक्षण मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व छ. संभाजीनगर यांना माहीतीसाठी.